RNI No.MAHAUL03008/13/182012-TC

नॅक पूनर्मूल्यांकित A ग्रेड

॥ नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

ISO-9001:2008 प्रमाणित

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे

# बाबुजी आव्हाड महाविद्यालय

पाथर्डी, जि.अहमदनगर (महाराष्ट्र).

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित)

व

## विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

यांचे संयुक्त विद्यमाने

## दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र



पॉवर ऑफ नॉलेज

विशेषांक

जानेवारी २०१८

ISSN-2320-4494
UGC approval
No. 45681

# दलित साहित्य : एक चिंतन

संपादक

डॉ. सुभाष शेकडे

डॉ. अशोक डोळस



४५) दलित कादंबरी : एक अभ्यास / ३०४
- डॉ. संजय दरवडे
४६) १९९० नंतरची दलित कादंबरी / ३०८
- प्रा. दत्तात्रय सावंत
४७) दलित आत्मकथने : निवेदन आणि भाषिक योगदान / ३१६
- प्रा.डॉ. सूर्यकांत गिते
४८) दलित कादंबरी : एक परीक्षण / ३२३
- प्रा. प्रशांत क्षिरसागर
४९) दलित साहित्यातील समतावादी व मानवतावादी विचार / ३२८
- प्रा.डॉ. अनिल गर्जे
५०) दलित कवितेतील विद्रोह / ३३३
- डॉ. शंकर वाघमारे
५१) संत साहित्यातील चोखोबांचे दलित संवेदन / ३३६
- डॉ. बी. आर. दहिफळे
५२) मराठीतील साहित्य प्रवाह : आदिवासी साहित्य / ३४४
- डॉ. रवींद्र शिंदे
५३) दलित नाटकातून दिसून येणाऱ्या दलितांच्या समस्या / ३४८
- प्रा.डॉ. सुभाष देशमुख
५४) दलित साहित्य निर्मितीमागील सामाजिकता / ३५२
- प्रा.डॉ. चंद्रकांत काळे
५५) दलित कवितेतून दिसून येणारे समाजचित्रण / ३५६
- प्रा.डॉ. जालिंदर कानडे
५६) आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्यिक : एक चिंतन / ३६०
- प्रा.डॉ. शैलेश त्रिभुवन
५७) न्याय हक्काचा लढा : दलित साहित्य चळवळ / ३६९
- प्रा. रमेश रिंगणे
५८) दलित राजकारण : समाज आणि साहित्य / ३७३
- प्रा. अरुण राख
५९) दलित साहित्य प्रवाहातील गुन्हेगारी जमातीचे चित्रण / ३७५
- आकाश पवार
६०) मराठी साहित्य आणि बहुजन साहित्य / ३८१
- आशा घोडके

# न्याय हक्काचा लढा : दलित साहित्य चळवळ

– प्रा. रमेश रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर,
गढी, ता. गेवराई, जि. बीड

दलित साहित्य चळवळीने यशस्वी पणे वाटचाल सुरू ठेवली आहे. यासंदर्भात विचारवंत दया पवार यांचे मत महत्त्वाचे वाटते. ''सांस्कृतिक आणि साहित्यिक जाणिवा व्यक्त करणारी चळवळ तशी एकदम सुरू होत नाही. १९२० सालापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रात जाणिवेच्या पातळीवर जे सर्वकष बंड नि वैचारिक आंदोलन दलित समाजाच्या ठायी उत्पन्न केले, त्याच्या एका आविष्कारातून दलित साहित्याचा जन्म झाला.''

दलितांच्या मनामध्ये आत्मभान निर्माण करून त्यास प्रोत्साहन देण्याचे महननीय काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांनी दलितांच्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारले. त्यामध्ये मनुस्मृतीचे दहन, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, महाडच्या तळ्याचा सत्याग्रह, इ.स. १९३० च्या गोलमेज परिषदेमध्ये मांडलेल्या दलितांच्या हक्कांचा जाहीरनामा, आणि इ.स. १९५६ साली आपल्या लाखो अनुयायांसमवेत केलेले बौद्ध धर्मांतर अशा घटनांचा दलितांच्या मनावर प्रभाव पडला, आणि त्यातूनच परिवर्तनासाठी त्यांची मने तयार झाली. दास्य, गुलामगिरीबाबत त्यांची मानसिकता बदलू लागली. अन् नवक्रांतसाठी तो धडपडू लागला. जुनाट रूढी, परंपरेला बाजूला सारून नवविचाराची कास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धरली. त्याचे फलित म्हणजे दलितांना स्वतःचे अस्तित्व प्राप्त झाले. गुलामगिरीवृत्ती–प्रवृत्तीला गाडण्याचा महामंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. इ.स. १९६० आणि १९७० ची दशके अनेक चळवळीने प्रभावित झालेली होती. विविध संघटना उदयास आल्या. ग्रामीण, आदिवासी, दलित, मजूर, शेतमजूर यांनी

आपल्या न्याय-हक्कासाठी याच काळात लढे उभे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या अस्मिता जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी आपल्यावर झालेला अन्याय-अत्याचार, गुलामगिरीची जाणीव करून दिली. त्यामुळे अंधारात चाचपडणाऱ्या दलित समाजाला वाट गवसली. माणसा-माणसातील भेदाभेद त्यांना जाणवू लागला. त्यामुळे दलित समाज खडबडून जागा झाला.

२०वे शतक हे भारतीय समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे शतक म्हणून ओळखले जाते. या परिवर्तनाची सुरुवात एकोणिसाव्या शतकातच विचारवंतांनी आणि समाजसुधारकांनी केली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही तत्त्वातचा राज्यघटनेतून पुरस्कार करण्यात आला. भारतीय संविधानामुळे इथल्या विषमतावादी व्यवस्थेला पायबंद निर्माण झाला. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात वैचारिक क्रांती सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून पशूवत्त जीवन जगणाऱ्या समाजाला जाग आली. या समाजाला डॉ. बाबासाहेबाच्या रुपाने महानायक मिळाला. त्यांनी दलितांना अमूल्य असा संदेश दिला. आपल्या जीवनाचे मार्गदाते स्वतःच व्हा. त्या संदेशातूनच दलित जनसमूह जागृत होऊ लागला. डॉ. बाबासाहेबांमुळे त्यांना जगण्याचे बळ मिळाले. आपल्या मनातील भाव-भावनांना वाट करून देण्यासाठी, आपले प्रश्न मांडण्यासाठी त्यांना साहित्याची गरज भासू लागली.

डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''१९६० नंतरचे दलित वैचारिक वाङ्मय अनेक अंगांनी फुलोरून आले आहे. याला एक महत्त्वाचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बुद्धधर्माची घेतलेली दीक्षा आणि समग्र समाजाला व दलित अभ्यासकांना दिलेली नवी दृष्टी आणि दुसरी घटना म्हणजे ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे झालेले महापरिनिर्वाण. या दोन्ही घटनांचा दलितांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर असीम असा प्रभाव पडला. दलितातील विचारकांनाही गतीत्व प्राप्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बौद्धिक वारसा पुढे नेण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.'' या प्रेरणेतून अनेक साहित्यिक पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून महाराष्ट्रामध्ये शिक्षण संस्था सुरू केल्या. त्यामुळे दलितांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण झाली. स्वतःबरोबरच समाजाच्या दारुण स्थितीगतीची जाणीव होऊ लागली. नवीन जाणिवेतून साहित्याची निर्मिती करू लागला. प्रस्थापित मराठी साहित्याला जे जमले नाही ते काम दलित साहित्यिक करू लागला. बाबासाहेब आंबेडकरांनी संस्था स्थापन केली. त्या

संस्थेतून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. सामाजिक परिस्थितीचे भान त्यांना आले. मुंबई-औरंगाबादप्रमाणे नागपूरसारख्या ठिकाणीही दलितांच्या काही शिक्षणसंस्था निघाल्या. सुशिक्षित दलित तरुण आत्मपरीक्षण करू लागला. वाचन, चिंतन करू लागला. त्यामुळे ज्ञानात भर पडली. बहुश्रुतता वाढीस लागली. नव्या जगाचे, अस्तित्वाचे आणि साहित्याचेही भान आले. नवजाणिवेतून पुढे आलेल्या दलित साहित्याचे मोठ्या प्रमाणात स्वागत करण्यात आले. कारण दलित साहित्याने मराठी साहित्याला एक वैभवसंपन्नता दिली. वैचारिक शक्ती दिली. या नव्या साहित्याच्या संदर्भात निर्मलकुमार फडकुले लिहितात, ''कोणी काही म्हटलं तरी दलित साहित्याच्या रुपानं एक जायिष्णू, अदम्य स्वरूपाचा प्रवाह मराठीत आपल्या अंगभूत सामर्थ्यानं येऊन मिसळला आणि त्यानं खळबळ उडवून दिली यात संदेह नाही. हे वादळ अपरिहार्य होतं. विध्वंसक आणि विधायक शक्तीच्या पंखानी ते झेपावतद राहिल. दलित साहित्याची निर्मिती हा चमत्कार किंवा अपघात मात्र नव्हे. ती एक अटळ परिणती आहे हे ज्यांना समजलं तेच सुबुद्ध रसिक त्याचं स्वागत करू शकेल.'' अशा रीतीने हा नव प्रवाह अनेकांची मने जिंकत गेला. आणि साहित्यविषयक नवदृष्टिकोन तयार होऊ लागला.

दलित साहित्याने मराठी वाङ्मयात आपला एक वेगळा दबदबा निर्माण केला. दलितलेखक साहित्यातीन अनुभव व जीवनातील घडामोडीचे चित्रण करत असला तरी तो एक व्यक्ती असला तरी अंतिमतः तो दलित समूहाचा एक प्रतिनिधी असल्याने त्याने लिहिलेले साहित्य हे ऐतिहासिक ठरते. आज दलित लेखक विविध साहित्य प्रकारांतून लेखन करतो आहे. सर्व समाजाला एकत्रित करण्याची व सामाजिक विषमता नष्ट करण्याची शक्ती दलित साहित्यामध्ये आहे. आपल्या वाट्याला आलेल्या जीवनाचे निर्भिड चित्रण आपल्या साहित्यातून करू लागला. कारण दलित अनुभूतीचा आविष्कार दलित साहित्यातील कविता, कादंबरी, कथा, आत्मकथने, नाटक व वैचारिक अशा विविध साहित्य प्रकारातील लेखनाला दलित साहित्याचा दर्जा प्राप्त झाला. आज अनेक साहित्यिक दलित साहित्याच्या चळवळीला योगदान देत आहे. आजच्या सामाजिक वास्तवतेने उग्ररूप धारण केले. आज विषमतेचे स्वरूप बदलल्याचे दिसते. जीवन जगण्याचे संदर्भ बदलले.

खाउजा धोरणामुळे गरीब अधिकच गरीब बनल्याचे चित्र आहे. यंत्राने प्राबल्य निर्माण केले. त्यामुळे सामान्य माणसाच्या हाताला काम नाही, दाम नाही, त्यामुळे चूल पेटत नाही. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणात दलित माणूस भरडला जात आहे. महागाई, उपासमारीने उच्चांक गाठला आहे.

झोपडपट्ट्यांची संख्या वाढतच आहे. कुपोषितांचा आकडा कोट्यावधी आहे. हे भीषण वास्तव आजच्या दलित साहित्यातून प्रखर आणि प्रखडपणे येण्याची आवश्यकता आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात दलितांचे काय स्थान आहे. त्यांच्या स्थितीगतीचा आढावा मोठ्या ताकदीने साहित्यातून मांडावा लागणार आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे दलितांच्या जीवनाची होणारी फरफट, दारिद्र्य, उपासमार, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य याबाबतीत दलितांची होणारी कोंडी कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन, ललित या वाङ्मयप्रकारातून लेखन करून आजच्या दाहक स्थितीगतीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरेल. दलित साहित्य चळवळीच्या माध्यमातून हजारो लेखक कवी निर्माण झाले. पहिल्या पिढीने दर्जेदार लेखन करून पुढील पिढीसाठी वाट दाखविली. आज चवथी पिढी या साहित्य प्रवाहाला सशक्त बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे. पहिल्या पिढीपुढील सामाजिक वास्तव वेगळे होते. जातीयता, धर्मांधतेने थैमान घातले होते. वेदना, विद्रोह, नकार ही मूल्ये घेऊन या पिढीने समाजाचे प्रश्न हाताळले. परंतु आजच्या पिढीसमोरील सामाजिक वास्तव पूर्वीच्या वास्तवापेक्षा वेगळे असून त्याचे स्वरूप बदलले आहे. म्हणून या जगामध्ये न्याय हक्कासाठी झालेल्या अनेक चळवळीत दलित साहित्य चळवळ प्रभावी आणि अत्यंत प्रवाहीपणे आजही आपल्या मानवतावादी दृष्टिकोनाचा अंगीकार करून प्रचार आणि प्रसारात अग्रेसर आहे. एकूणच साहित्याला मानवी मूल्य प्राप्त करून देण्यात दलित साहित्य चळवळीने आपल्या भूमिका आणि तत्त्वाने एक आदर्श आपल्या समोर उभा केला आहे. त्याचे मूळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून आले असल्यामुळे ते सदैव उर्जादायी ठरणार आहे. त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रामध्ये या चळवळीने निर्माण केलेल्या आचार विचाराच्या पायावरच येणाऱ्या साहित्यिकांनी आपल्या अनुभवाची शब्दशिदोरी उभारावी.

**संदर्भ :**


१) दया पवार – दलित साहित्य चर्चा आणि चिंतन, संपा. गंगाधर पानवातणे, साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९३, पृ. १२२.

२) डॉ. गंगाधर पानवातणे – दलित वैचारिक वाङ्मय, प्रकाशक– डॉ. जयराम चव्हाण, प्रथमावृत्ती मे १९९५, पृ. २८–२९.

३) डॉ. निर्मलकुमार फडकुले – दलित साहित्य, संपा. शरणकुमार लिंबाळे, प्रकाशक– सौ. नंदिनी तु. गवळी, आवृत्ती एप्रिल १९९१, कोल्हापूर, पृ. १५०.


•••